संपर्क क्र. ९३७२१९९६६८

# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, रायगड पदभरती जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि.२९/०६/२०२६ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता | संबधित पदाचे नियुक्तीचे ठिकाण | कार्यक्रम निहाय रिक्त पदे | आरक्षण निहाय रिक्त पदे | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स /एल.एच.व्ही (पुरुष) | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | **प्रा.आ.केंद्र स्तर / उपजिल्हा रुग्णालय स्तर / ग्रामीण रुग्णालय स्तर** | 10 | अ.ज.- १, भ.ज.ब.१, इमाव २, एसईबीसी २, ईडब्ल्यूएस १ खुला ३ | २००००/- |
| २ | १५ व्या वित्त आयोग – स्टाफ नर्स (पुरुष) | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | **रायगड जिल्हयांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र** | 3 | अ.जा.१, वि.जा.अ.१, खुला १ | २००००/- |
| ३ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी पुरुष (१५ वा वित्त आयोग) | 12th pass in Science or equivalent course passed **AND** Paramedical Basic training Course **Or** Sanitary Inspector Course (Government Recognized Institute) | **रायगड जिल्हयांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र** | 25 | अ.जा. ३, अ.ज.२, भ.ज.ब.१, भ.ज.क.१, भ.ज.ड.१, इमाव ५, एसईबीसी ३, ईडब्ल्यूएस २ खुला ७ | १८०००/- |
| ४ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी पुरुष (आपला दवाखाना) | 12th pass in Science or equivalent course passed **AND** Paramedical Basic training Course **Or** Sanitary Inspector | **रायगड जिल्हयांतर्गत हिंदुहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना** | 10 | अ.जा. १, अ.ज.२, वि.जा.अ.१, भ.ज.ब.१, एसईबीसी २, ईडब्ल्यूएस १, खुला २ | १८०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Course (Government Recognized Institute) | | | | |
| ५ | **Entomologist** (BPHU) | **M.Sc. Zoology with 5 years' experience** | १) BPHU पेण, ता.पेण<br>२) BPHU महाड, ता.महाड<br>३) BPHU पोलादपूर, ता. पोलादपूर<br>४) BPHU श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन<br>५) BPHU मुरुड, ता. मुरुड<br>६) BPHU रोहा, ता.रोहा<br>७) BPHU कर्जत, ता.कर्जत<br>८) BPHU उरण, ता.उरण<br>९) BPHU म्हसळा, ता. म्हसळा<br>१०) BPHU अलिबाग, ता. अलिबाग<br>११) BPHU खालापूर, ता. खालापूर<br>१२) BPHU पनवेल, ता. पनवेल<br>१३) BPHU माणगांव, ता. माणगांव<br>१४) BPHU सुधागड, ता. सुधागड<br>१५) BPHU तळा, ता.तळा | 15 | अ.जा. २,<br>अ.ज.१,<br>वि.जा.अ.१,<br>भ.ज.ब.१,<br>इमाव ३,<br>एसईबीसी २,<br>ईडब्ल्यूएस १<br>खुला ४ | ४००००/- |
| ६ | **Public Health Specialist** (BPHU) | **Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA in Health Care Management** | १) BPHU पेण, ता.पेण<br>२) BPHU महाड, ता.महाड<br>३) BPHU पोलादपूर, ता. पोलादपूर | 15 | अ.जा. २,<br>अ.ज.१, वि.जा.अ.१,<br>भ.ज.ब.१,<br>इमाव ३,<br>एसईबीसी २,<br>ईडब्ल्यूएस १<br>खुला ४ | ३५०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ४) BPHU श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन<br>५) BPHU मुरुड, ता. मुरुड<br>६) BPHU रोहा, ता.रोहा<br>७) BPHU कर्जत, ता.कर्जत<br>८) BPHU उरण, ता.उरण<br>९) BPHU म्हसळा, ता. म्हसळा<br>१०) BPHU अलिबाग, ता. अलिबाग<br>११) BPHU खालापूर, ता. खालापूर<br>१२) BPHU पनवेल, ता. पनवेल<br>१३) BPHU माणगांव, ता. माणगांव<br>१४) BPHU सुधागड, ता. सुधागड<br>१५) BPHU तळा, ता.तळा | | | |
| ७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (BPHU) | **12th + Diploma (महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य)** | १) BPHU पेण, ता.पेण<br>२) BPHU महाड, ता.महाड<br>३) BPHU पोलादपूर, ता. पोलादपूर<br>४) BPHU श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन<br>५) BPHU मुरुड, ता. मुरुड<br>६) BPHU रोहा, ता.रोहा<br>७) BPHU कर्जत, ता.कर्जत<br>८) BPHU उरण, ता.उरण | 30 | अ.जा. ४, अ.ज.३, विजाअ १, भजब १, भजक १, इमाव ६, एसईबीसी ३, ईडब्ल्यूएस ३, खुला ८ | १७०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ९) BPHU म्हसळा, ता. म्हसळा<br>१०) BPHU अलिबाग, ता. अलिबाग<br>११) BPHU खालापूर, ता. खालापूर<br>१२) BPHU पनवेल, ता. पनवेल<br>१३) BPHU माणगांव, ता. माणगांव<br>१४) BPHU सुधागड, ता. सुधागड<br>१५) BPHU तळा, ता.तळा<br>(**प्रत्येक BPHU साठी २ पदे याप्रमाणे**) | | | |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (NTEP) | **12th + Diploma** **(महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य)** | १) उपजिल्हा रुग्णालय पेण<br>२) उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन<br>३) नगरपालिका दवाखाना खोपोली<br>४) उपजिल्हा रुग्णालय कर्जत<br>५) ग्रामीण रुग्णालय उरण<br>६) MGM वैद्यकिय महाविद्यालय कामोठे | 6 | अ.जा.१, अ.ज.२, वि.जा.अ.१, एसईबीसी १, ईडब्ल्यूएस १ | १७०००/- |
| ९ | जिल्हा कार्यक्रम समन्वयक (ASHA & EMS) | **MSW or MA in Social Sciences** | **१) राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), कुंटे बाग अलिबाग**<br>**२) राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 2 | वि.जा.अ.१ व एसईबीसी १ | २००००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | **District QA Coordinator** | **Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | अ.जा. १, अ.ज.१, इमाव १, एसईबीसी १, ईडब्ल्यूएस १ खुला २ | ३५०००/- |
| ११ | **CPHC Consultant** | **Any Medical Graduate with MPH / MHA/MBA Health Care - with relevant programmatic experience** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | | ३५०००/- |
| १२ | **District Programme Cordinator (NPCDCS)** | **Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | | ३५०००/- |
| १३ | **Hospital Manager** | **Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | | ३५०००/- |
| १४ | **District Programme Coordinator (NTEP)** | **Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health** | **राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम कार्यालय** | 1 | | ३५०००/- |
| १५ | **District Epidemiologist** | **Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | | ३५०००/- |
| १६ | **Ayush Consultant** | **Any Medical Graduate with MPH / MHA/MBA Health Care - with relevant programmatic experience** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | | ३५०००/- |
| १७ | **Optometrist** | **B.Sc in Optometry - 2 years exp** | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग** | 1 | आरक्षण लागू नाही | २००००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | Dental Technician | 12th + Diploma (महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य ) | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग | 1 | अ.ज-१<br>विजाअ-१<br>खुला-१ | १७०००/- |
| | Dental Hygienist | | | 2 | | |
| १९ | Physiotherapist | Graduate Degree in Physiotherapy - 2 years exp | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग | 3 | अज-१<br>विजाअ-१<br>इमाव-१ | २००००/- |
| २० | Audiologist | Degree in Audiology | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग | 1 | अज-१ | २५०००/- |
| २१ | Dentist | BDS with 2 years exp or MDS (without exp) | उजिरु पेण-१<br>उजिरु माणगांव-१ | 2 | विजाअ-१<br>एसईबीसी-१ | ३००००/- |
| २२ | Pharmacist | 12th + Diploma (महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य ) | ग्रा.रु.उरण-२<br>ग्रा.रु. पोलादपूर-१<br>ग्रा.रु.महाड-१<br>उजिरु कर्जत-१<br>उजिरु पनवेल-४<br>जि.रु. अलिबाग-३ | 12 | अ.जा-३<br>अ.ज.-२<br>भजब-१<br>भजड-१<br>एसईबीसी-४<br>ईडब्ल्यूएस-१ | १७०००/- |
| २३ | RBSK Medical Officer (Female) | BAMS/ BUMS | ग्रा.रु.महाड-२<br>उजिरु माणगांव-२<br>ग्रा.रु.म्हसळा-१<br>ग्रा.रु.मुरुड-१<br>ग्रा.रु. पोलादपूर-१<br>उजिरु कर्जत-१<br>ता.आ.अ. पाली-१ | 9 | अजा-१<br>अज-१<br>विजाअ-१<br>भजब-१<br>भजक-१<br>भजड-१<br>इमाव-२<br>एसईबीसी-१ | २८०००/- |

तरी वर नमुद क्र.२२ Pharmacist या संवर्गातील जि.रु.अलिबाग, उजिरु पनवेल, उजिरु कर्जत व ग्रा. रु.उरण या संस्थामधील व क्र.२३ RBSK Medical Officer (Female) या संवर्गातील ता.आ.अ. पाली, महाड, म्हसळा, मुरुड, पोलादपूर या संस्थामधील पदे यापूर्वी आवश्यक आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्याने तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आलेली आहेत. त्याअनुषंगाने या पदभरती प्रक्रियेनुसार आवश्यक

**आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध झाल्याचे यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आलेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**याशिवाय BPHU कार्यक्रमांतर्गत पद क्र.५, ६ व ७ या यासाठी सद्यस्थितीत ज्या संस्था पूर्ण झाल्या आहेत, सद्यस्थितीत त्याच संस्थांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**अटी व शर्ती :-**

१. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकीय सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियान मधुन कोणत्याही संस्थास्तरावरुन एखादया कर्मचा-यांच्या अकार्यक्षमता / अनियमितेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आल्या असतील तर त्या कर्मचाा-याचा या पुढे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कोणत्याही पदाकरिता विचार केला जाणार नाही.

३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झाला नसावा.

४. उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र / कौन्सिलचे रजिस्ट्रेशनसाठी अर्ज सादर केलेबाबतची पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापि अवैध प्रमाणपत्र उमेदवारांना भरतीप्रक्रियेतुन अपात्र ठरविले जाईल.

५. निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

६. सविस्तर जाहिरात पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड / प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती / सुचना http://www.zpraigad.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सर्व मूळ कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करण्यात येतील सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे –**

गुणांकन पध्दती :- वरील सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१.Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०*२० /१०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |

१. शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या संबंधित अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्याच पदाचा असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

२. वरिल सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधन तत्वानुसार भरण्यात येणार असुन सदरील नियुक्ती आदेश हे निर्गमित केलेल्या तारखेपासुन ते दिनांक २९/०६/२०२६ पर्यंतच्या कालावधीकरिता भरण्यात येणार आहेत. पुढील पुनर्नियुक्ती आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधरित असेल.

३. अर्जदाराला सोयीनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

४. निवड यादीतील गुणानुक्रमानुसार, सामाजिक आरक्षणानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना केली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांस पुढील सर्व भरती प्रक्रियेतून कायमचे बाद ठरविण्यात येईल.

५. उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदाकरिता तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

६. सदर जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

७. केंद्र शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल. तसेच जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो व रिक्त ठिकाणामध्ये बदल होवू शकतो याची नोंद घ्यावी.

८. उमेदवारांनी अर्ज करित असलेल्या पदाचे नाव व स्वतःच्या जातीचा प्रवर्ग अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा. जर एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत. तसेच ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याच पदासाठी अर्ज ग्राहय धरला जाईल. तसेच कार्यक्रमाचे नाव स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

९. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी.

१०. ज्या उमेदवाराना ग्रेड सिस्टीम / CGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सूत्राची विद्यापिठाची अधिकृत प्रत अर्जासोबत जोडावे. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११. दि.२३/०७/२०२० च्या पत्रानुसार दोन पेक्षा अधिक हयात मुले असणा-या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरुन अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१२. राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनेनुसार अर्ज करणा-या उमेदवारांनी यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता / अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आली असल्यास सदर पदभरतीकरीता अशा उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

**१३. राज्यस्तरावरुन आरक्षणानुसार मंजुर प्रमाणित केलेल्या पदनिहाय बिंदूनामावलीनुसार राखीव प्रवर्गाकरिता असलेल्या पदांकरिता राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीवरील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल व संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल.**

१४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा त्याची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१५. भरती प्रक्रिया स्थगित करणे / रद्द करणे / पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

१६. नियुक्ती आदेश स्वीकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्राच्या मुळप्रती पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक राहील. मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. याची नोंद घ्यावी.

१७. प्राप्त झालेल्या अर्जांवरुन गुणांकनानुसार तसेच पदभरतीच्या दिवशी सादर केलेल्या मुळ कागदपत्रांच्या तपासणीनुसार मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. सदर मेरीट लिस्ट नुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल व त्यानंतर पात्र उमेदवारांना प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१८. सदर भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर प्रतिक्षा यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन ०१ वर्षापर्यंत वैध राहील.

१९. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

२०. जाहिरातीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नमुद पदाचे मानधन हे एकत्रित मासिक मानधन आहे.

२१. जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील तथा रुग्णसेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारिका, तंत्रज्ञ, अधिपरिचारिका, समुपेदशक) वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवाप्रवेश मर्यादा ०५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. ६० वर्षावरिल अर्जदारांकरिता जिल्हा शल्यचिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२२. विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज, मजकुर अपुर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज, स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अपूर्ण भरलेले व न जोडलेले अर्ज इत्यादी प्रकारे सादर केलेल्या अर्जदारांना अपात्र ठरविण्यात येईल याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

२३. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

- विहीत नमुन्यातील अर्ज (सदर अर्जाचा नमुना जाहिराती सोबत संकेत स्थळावर उपलब्ध असेल)
- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१०वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षे व सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)

- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच COVID अंतर्गत शासकिय आरोग्य संस्थेतील विहित पदासाठी काम केलेल्या अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच विनावेतन, अर्धवेळ, प्रशिक्षण कालावधी, अॅड-हॉक (Ad-hoc), अंतरवासिता (Internship) चा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र
- आधारकार्ड
- पॅनकार्ड
- लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

सदर पदभरती प्रक्रियेसाठी इच्छूक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज दि.१२/०१/२०२६ ते दि.१३/०१/२०२६ (पुढे नमुद वेळापत्रकानुसार) या कालावधीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, कुंटे बाग, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अलिबाग, जि.रायगड, पिन ४०२२०१ येथे पुढे नमुद वेळापत्रकानुसार सादर करावेत.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स /एल.एच.व्ही (पुरुष) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| २ | १५ व्या वित्त आयोग - स्टाफ नर्स (पुरुष) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ३ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी पुरुष ( १५ वा वित्त आयोग) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ४ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी पुरुष (आपला दवाखाना) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ५ | Entomologist (BPHU) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ६ | Public Health Specialist (BPHU) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (NTEP) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (BPHU) | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| ९ | जिल्हा कार्यक्रम समन्वयक (ASHA & EMS) | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १० | District QA Coordinator | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | CPHC Consultant | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १२ | District Programme Cordinator (NPCDCS) | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १३ | Hospital Manager | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १४ | District Programme Coordinator (NTEP) | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १५ | District Epidemiologist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १६ | Ayush Consultant | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १७ | Optometrist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १८ | Dental Technician | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| | Dental Hygenist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| १९ | Physiotherapist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| २० | Audiologist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| २१ | Dentist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| २२ | Pharmacist | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |
| २३ | RBSK Medical Officer (Female) | दि.१३/०१/२०२६ | सकाळी १० ते दुपारी १२ |

वर नमुद वेळापत्रकानुसार विहित दिनांकानंतर दुपारी १२.०० नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही तसेच ईमेलव्दारे अथवा टपालाव्दारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही, पदभरतीच्या प्रत्यक्ष दिवशी विहित वेळेत प्रत्यक्ष उमेदवाराने सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाईल याची, उमेदवारांनी नोंद घ्यावी. याशिवाय सोबत जोडलेल्या नमुन्यातील पूर्णपणे भरलेला अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रे व नमुन्यामध्ये जोडलेली कागदपत्रांची यादी (चेकलिस्ट) अशा परिपूर्ण कागदपत्रांसह उमेदवारांनी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

२४. सेवानिवृत्त शासकिय अधिकारी / कर्मचारी यांना मुळ वेतन (**Basic Pay**) + ग्रेड पे या दोन्ही रक्कमेची बेरीज वजा निवृत्ती वेतन यामधील फरकाची रक्कम मानधन म्हणून अनुज्ञेय राहील.

२५. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत यापुर्वी रिक्त पदांची भरती करीत असताना राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्याने तात्पुरत्या स्वरुपात इतर राखीव प्रवर्गाचे उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच पुरुष उमेदवार उपलब्ध न झाल्याने तात्पुरत्या स्वरुपात महिला उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. तरी सदर जाहिरात प्रसिध्द केलेनंतर

मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांचेकडून प्रमाणित झालेल्या बिंदु नामावली नुसार राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झालेस तसेच पुरुष उमेदवार उपलब्ध झाल्यास त्यांना नियुक्ती आदेश देणेत येतील.

२६.राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवानिवृत्त (कंत्राटी) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मानधन निश्चित करताना फरकाची रक्कम व प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील पदनिहाय मंजूर मानधनाची रक्कम किंवा पदाचे सदयस्थितीतील अनुज्ञेय मानधन यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

२७. **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- चा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. व डिमांड ड्राफ्टच्या मागे स्वतःचे नाव, व कोणत्या पदासाठी अर्ज सादर केला त्या पदाचे नाव स्वहस्ताक्षरात लिहावे. सदरचा डिमांड ड्राफट "District Integrated Health & Family Welfare Society Raigad – HR" या नावे अलिबाग या शाखेवर देय असलेला असावा.**

दिनांक :-०६/०१/२०२६
ठिकाण :- अलिबाग

(डॉ.आनंद गोसावी)
सदस्य सचिव, निवड समिती
तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

(डॉ.नेहा भोसले) भा.प्र.से.
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.